# प्राथमिक शिक्षण संचालनालय,

**महाराष्ट्र राज्य, डॉ. ॲनी बेझंट रोड, मध्यवर्ती इमारत, पुणे – १**

दुरध्वनी . (०२०) २६०५ ४३१८

email : depmah2@gmail.com

website : www.depmah.com


क्रमांक : आर.टी.ई./२०२०-२१/टे-५२०/१८९३

दिनांक : १७.०६.२०२०

**प्रति,**

**शिक्षणाधिकारी बृहन्मुंबई मनपा**

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, सर्व.**

**विषय** : सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाच्या आर.टी.ई. अंतर्गत २५ टक्के प्रवेश प्रक्रीयेबाबत.

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील कलम (१२)(१)(सी) नुसार खाजगी विनाअनुदानित /कायम विनाअनुदानित /स्वयंअर्थसहाय्यित शाळांमध्ये प्रवेश स्तरावर २५ टक्के जागा वंचित व दुर्बल घटकातील मुलांसाठी राखीव ठेवण्याची तरतूद आहे.

शैक्षणिक वर्ष सन २०२०-२१ या वर्षासाठी आर.टी.ई. अंतर्गत २५ टक्के प्रवेशाबाबत ऑनलाईन अर्ज मागवून दिनांक १७.०३.२०२० रोजी लॉटरी काढण्यात आली आहे. लॉटरी द्वारे १००९२० विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे. तसेच ७५४६५ विद्यार्थ्यांची प्रतिक्षा यादी जाहिर केली आहे. सर्व विद्यार्थ्यांना मेसेज पाठविण्यात आले आहेत. लॉकडाऊन मुळे पुढील प्रवेश प्रक्रीयेचे कामकाज झालेले नाही. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी प्रवेश प्रक्रीया राबविण्यासाठी शासनाने मान्यता दिलेली आहे.

शैक्षणिक वर्ष सन २०२०-२१ हे दिनांक १५.०६.२०२० पासून सुरु झालेले आहे. सद्यस्थितीत पडताळणी केंद्रावर पडताळणी समितीकडे जावून कागदपत्रांची पडताळणी करणे अडचणीचे आहे. त्यामुळे फक्त या शैक्षणिक वर्षासाठी शाळा स्तरावर कागदपत्रांची प्राथमिक पडताळणी करुन व संकलन करुन पडताळणी समितीच्या मान्यतेने प्रवेश देण्यात यावेत.

## शाळेने करावयाची कार्यवाही

१. शाळेला आर.टी.ई. पोर्टलवर त्यांच्या लॉगीनला विद्यार्थ्यांची नावे व मोबाईल क्रमांक दिलेले आहेत. या नावापुढे ज्या दिनांकास विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी बोलावयाचे आहे ती तारीख शाळेने टाकावी त्याप्रमाणे पालकांना एस.एम.एस. जातील. गर्दी होणार नाही अशा प्रकारे शाळेने नियोजन करावे. कोणत्या तारखेला बोलवावे हे शाळेने ठरवावे.

२. प्रवेशाचे वेळापत्रक शाळेच्या गेटवर अथवा योग्य त्या ठिकाणी लावण्यात यावे.

३. शाळेत आल्यानंतर पालकांकडून मूळ कागदपत्रे व एक छायांकित प्रत प्राप्त करुन घ्यावी. कागदपत्राची प्राथमिक तपासणी करुन योग्य असल्यास विद्यार्थ्यांच्या नावापुढे ऑनलाईन नोंद करावी तसेच पालकाकडील अलॉटमेंट लेटर वर तात्पुरता प्रवेश दिला असे नोंद करावे व ती नोंद करुन पालकांना परत करावे. तसेच पालकांकडून हमीपत्र भरुन घ्यावे.

४. काही पालक मूळ गावी किंवा अन्य जागी स्थलांतर झाले असल्याची शक्यता आहे, त्यामुळे दिलेल्या तारखेस पालक आले नाही तर त्यांना पुन्हा पुढची तारीख देण्यात यावी. तसा एस.एम.एस. त्यांना जाईल. दुसऱ्यांदा दिलेल्या तारखेला उपस्थित न राहील्यास तिसऱ्यांदा तारीख देण्यात यावी. अशा प्रकारे पालकांना तीन वेळा संधी द्यावी.
५. शाळेने ऑनलाईन अभ्यासक्रम सुरु केल्यानंतर अशा तात्पुरत्या प्रवेशीत बालंकाना लाभ देण्यात यावा. शाळा जेव्हा प्रत्यक्षात सुरु होईल तेव्हा या बालकांना प्रवेशित झाले असे समजून वर्गात बसण्याची मुभा द्यावी.
६. शाळेने पडताळणी समितीची दिनांक व वेळ घेऊन पालकांकडून संकलित केलेली सर्व आवश्यक मूळ कागदपत्रे घेऊन जावे व पडताळणी समितीकडून प्रवेश निश्चित करावेत.
७. शाळेने प्रतिक्षायादीतील पालकांना सध्या बोलवू नये. त्याबाबत स्वतंत्र सूचना देण्यात येतील.
८. कोरोना प्रतिबंधित क्षेत्रातील पालकांना निर्बंध शिथिल झाल्यानंतर बोलविण्यात यावे.
९. शाळा कोरोना प्रतिबंधित क्षेत्रात असल्यास अथवा शाळा अन्य कामासाठी प्रशासनाने ताब्यात घेतली असल्यास अशा शाळांनी प्रतिबंधित क्षेत्रातील अटी शिथील झाल्यानंतर प्रवेशाबाबत कार्यवाही करावी.

## पालकांनी करावयाची कार्यवाही

१. शाळेचा प्रवेशाबाबत मेसेज आल्यानंतर त्या दिनांकास सर्व मूळ आवश्यक कागदपत्रे व एक छायांकित प्रत घेऊन शाळेत उपस्थित रहावे व कागदपत्रांच्या पडताळणीस अधीन राहून तात्पुरता प्रवेश घ्यावा. तसेच हमीपत्र शाळेला द्यावे.
२. शाळेने दिलेल्या दिनांकास उपस्थित राहता येणे शक्य नसल्यास, शाळेला तसे कळविण्यात यावे व पुढील दिनांकाची मागणी करावी.
३. शाळेच्या मेसेज वर अवलंबून न राहता आर.टी.ई. पोर्टलवर बालकांचा अर्ज क्रमांक टाकून प्रवेशाच्या दिनांकाची खात्री करावी.
४. आर.टी.ई. पोर्टलवर पालकांसाठी दिलेल्या सूचनांचे पालन करावे.
५. पडताळणी समितीस कागदपत्रे चुकीची आढळून आल्यास व आर.टी.ई. पोर्टलवर चुकीची माहिती भरल्याचे निदर्शनास आल्यास हमी पत्रातील अटीप्रमाणे कारवाई करण्यात येईल.
६. शाळेचा प्रवेशाबाबत मेसेज/फोन/ऑनलाईन पोर्टल वर प्रवेशाचा दिनांक दिसून आल्यास त्याच दिनांकास जावे, तोपर्यंत शाळेत अथवा पडताळणी केंद्रावर गर्दी करु नये.

## पडताळणी समितीने करावयाची कार्यवाही

१. आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व शाळांवर प्रवेशाबाबत देखरेख करावी. शाळा या पत्रातील सूचनेप्रमाणे कार्यवाही करीत आहे याची खात्री करावी. शाळेला व पालकांना मार्गदर्शन करावे. तसेच प्रसिध्दीही द्यावी.
२. प्रत्येक शाळेला कागदपत्रांच्या पडताळणीसाठी दिनांक व वेळ देण्यात यावी.
३. कागदपत्रांची पडताळणी करुन प्रवेश निश्चित करावे. तशी नोंद ऑनलाईन पोर्टलवर करावी.

४. पडताळणी मध्ये कागदपत्रे चुकीची आढळून आल्यास किंवा पालकांनी ऑनलाईन पोर्टलवर चुकीची माहिती भरल्याचे निदर्शनास आल्यास प्रवेश रद्द करणे/फौजदारी कार्यवाही करणे/शासकीय प्रतिपूर्तीस बालकास अपात्र करणे त्यामुळे पालकाने शाळेची पूर्ण फी भरणे यापैकी एक किंवा एकापेक्षा जास्त शिक्षा प्रकरणांचे गांभीर्य लक्षात घेऊन करण्यात यावे.

## शिक्षणाधिकारी स्तरावरुन करावयाची कार्यवाही

१. प्रवेश प्रक्रीयेबाबत संपूर्ण जिल्हयात संनियत्रंण करावे.
२. प्रवेश प्रक्रीयेबाबत योग्य ती प्रसिध्दी द्यावी.
३. पडताळणी समिती व पालक व शाळा यांना योग्य ते मार्गदर्शन करावे.
४. चुकीचे प्रवेश होणार नाही, याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी.

उपरोक्त सूचनांचे पालन करतांना स्थानिक स्तरावरील सक्षम प्राधिकाऱ्यांची मान्यता घेऊन कार्यवाही करावी. तसेच एन.आय.सी. स्तरावरुन आवश्यक बदल करण्यात येत आहे. सदर सुविधा शाळेला दिनांक २४.०६.२०२० उपलब्ध होतील.

**सोबत : हमी पत्राचा नमुना**

**(द. गो. जगताप)**
शिक्षण संचालक (प्राथमिक)
महाराष्ट्र राज्य, पुणे-०१

**प्रत : माहितीस्तव सविनय सादर**

१. मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,मुंबई -३२
२. मा.आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. मा. आयुक्त मनपा, (सर्व)
४. मा. जिल्हाधिकारी (सर्व)

**प्रत : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव**

१. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
२. उपसंचालक (एन.आय.सी.)/श्रीम . आदिती एकबोटे, एन.आय.सी. पुणे

**२/- उपरोक्त पत्रातील सुचनेप्रमाणे सॉफ्टवेअर आवश्यक ते बदल करावे.**

# हमी पत्र

विद्यार्थ्यांचे नाव..........................................................अर्ज क्रमांक........................ विद्यार्थ्यांचा आई/वडील/पालक श्री./श्रीम./सौ.......................................................................हमी पत्र लिहून देतो/देते की आर.टी.ई. २००९ अंतर्गत २५ टक्के प्रवेश शैक्षणिक वर्ष २०२०-२१ या प्रक्रीयेसाठी मी सादर केलेली कागदपत्रे बरोबर असून मी आर.टी.ई. पोर्टलवर माहिती बरोबर भरली आहे. भविष्यात अथवा पडताळणी समितीने कागदपत्रांची व पोर्टलवर भरलेल्या माहितीची पडताळणी केल्यास व त्यामुळे चुकीची कागदपत्रे अथवा माहिती भरल्याचे निदर्शनास आल्यास माझ्या पाल्याचा प्रवेश रद्द होईल, माझ्यावर फौजदारी कारवाई होईल किंवा प्रतिपूर्तीची रक्कम शासनाकडून मिळणार नाही व त्यामुळे शाळेची सर्व फी भरणे मला बंधनकारक राहील. उपरोक्त पैकी एक किंवा एकापेक्षा जास्त शिक्षा होतील याची मला जाणीव आहे.

तारीख :

सही व नांव :

मोबाईल क्रमांक :